**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.**

क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १२

**सभावृत्तांत**

**दिनांक - ०८/१०/२०२१** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०८/१०/२०२१** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व्दारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा.सदस्य मा.सभापती यांचे दालनात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व्दारे) उपस्थित होते.

**१. मा. उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**
**२. मा. अश्विनी संतोष जाधव**
**३. मा. शैलेश ऊर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे**
**४. मा. दर्शले रेखा राजेश**

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.सुषमा शिंदे व मा. रज्जाक पानसरे क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

विषय क्र.१ - पिंपरी चिंचवड महानगरपालिका व्यावसायिक कबडडीसंघ (महिला व पुरुष) धोरण मसूदा तयार करणे बाबत. मा.शैलेश मोरे व मा.रेखा दर्शले याचां प्रस्ताव.

विषय क्र.२ – पिंपरी चिंचवड संगीत अकादमी, निगडी यास भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमी असे नाव देणेस मा.महापालिकासभेकडे शिफारस करणे.
मा.शैलेश मोरे व मा.रेखा दर्शले याचां प्रस्ताव

विषय क्र.३ - कै.प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल, यमुनानगर येथे माहे- नोव्हेंबर/डिसेंबर २०२१ मध्ये संगीत महोत्सव कार्यक्रम आयोजित करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यतादेणेकामी मा.स्थायी सभेकडे शिफारस करणे बाबत.
मा.शैलेश मोरे व मा.रेखा दर्शले याचां प्रस्ताव

विषय क्र.४ - क्रीडा विभागाकडील विदयुत विषयक कामकाजासाठी क्रीडा विदयुत असा स्वतंत्र विभाग तयार करुन आवश्यक अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्तीस मान्यमाकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणे बाबत.
मा.शैलेश मोरे व मा.रेखा दर्शले याचां प्रस्ताव

-----------------------

**सुचक - मा.शैलेश मोरे** **अनुमोदक - मा.रेखा दर्शले**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समितीची शुक्रवार दि.०८/१०/२०२१ रोजीची दुपारी ३.०० वा. ची पाक्षिक सभा मंगळवार दि.१२/१०/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.**

**सदरची सूचना सर्वानुमते मान्य झाली.**

**मा. सभापती - मंगळवार दि.१२/१०/२०२१ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.**

( **उत्तम प्रकाश केंदळे** )
**सभापती**
क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.**

क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १२ (दि.०८/१०/२०२१ ची तहकूब सभा)

**सभावृत्तांत**

**दिनांक - १२/१०/२०२१** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा दि.०८/१०/२०२१ रोजीची तहकूब सभा मंगळवार दिनांक १२**/१०/२०२१** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व्दारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा.सदस्य मा.सभापती यांचे दालनात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व्दारे) उपस्थित होते.

**१. मा. . उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**
**२. मा. अश्विनी संतोष जाधव**
**३. मा . शैलेश ऊर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे**
**४. मा. दर्शले रेखा राजेश**
**५. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ**

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.सुषमा शिंदे व मा.रज्जाक पानसरे क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

अ) दिनांक १३/०८/२०२१, २७/०८/२०२१, १३/०९/२०२१ व १७/०९/२०२१ रोजी झालेल्या (कार्यपत्रिका क्रमांक ०९ चा सभावृत्तांत ) कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १३/०९/२०२१ व १७/०९/२०२१ रोजी झालेल्या (कार्यपत्रिका क्रमांक १० चा सभावृत्तांत ) कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक २४/०९/२०२१ रोजी झालेल्या (कार्यपत्रिका क्रमांक ११ चा सभावृत्तांत ) कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------------------------------

ठराव क्रमांक - ४९ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १२/१०/२०२१

सुचक :- मा.शैलेश मोरे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ - मा.शैलेश मोरे व मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

महानगर पालिका कार्यक्षेत्रात क्रीडा विकासाच्या उद्दिष्टासाठी राज्याच्या पहिल्या धोरणात सुचविलेल्या महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.जी.ई.एन.१०९८/प्र.क्र.-२१/९८ नवी-२४ मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.९ मार्च १९९८ च्या शासन निर्णयानुसार खेळ व संघ दत्तक घेणेस मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपलिका व्यावसायिक कबड्डी संघ (महिला व पुरुष) तयार करणे या अनुषंगाने धोरण मसुदा तयार करणे आवश्यक आहे. सबब महानगर पालिका कार्यक्षेत्रात क्रीडा विकासाच्या उद्दिष्टासाठी राज्याच्या पहिल्या धोरणात सुचविलेल्या महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.जी.ई.एन. १०९८/प्र.क्र.-२१/९८ नवी-२४ मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.९ मार्च १९९८ च्या शासन निर्णयानुसार खेळ व संघ दत्तक घेणेस मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपलिका व्यावसायिक कबड्डी संघ (महिला व पुरुष) तयार करणे या अनुषंगाने धोरण मसुदा तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

-------------------

ठराव क्रमांक - ५० विषय क्रमांक - ०२

दिनांक - १२/१०/२०२१

सुचक :- मा.शैलेश मोरे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ - मा.शैलेश मोरे व मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी चिंचवड संगीत अकादमी स्थापना दि. ८ जून २००१ रोजी आहे. तेव्हापासून सदर अकादमी मध्ये विधिवत संगीत देण्याचे कार्य चालू आहे.या संगीत अकादमीमध्ये आजपर्यंत शेकडो विदयार्थ्यांनी लाभ घेतला आहे.संगीत क्षेत्रात अनेक नामवंत कलाकार यांचे सादरीकरण झाले आहे. पिंपरी चिंचवड संगीत अकादमी यास भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रात समर्पित असलेले दिग्गज शास्त्रीय गायक भारतरत्न् पडित भीमसेन जोशी संगीत अकादमी असे नाव दिल्यास पिंपरी चिंचवड संगीत अकादमी याचा प्रसार प्रचार होण्यास आणखी मदत होईल. सबब पिंपरी चिंचवड संगीत अकादमी निगडी यास भारतरत्न पंडित भीमसेन जोशी संगीत अकादमी निगडी असे नाव देण्यास मान्यता देणेकामी

मा.महापालिका सभेकडे मान्यता कामी शिफारस करणेत येत आहे. सभा वृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----------------------

ठराव क्रमांक - ५१ विषय क्रमांक - ०३

दिनांक - १२/१०/२०२१

सुचक :- मा.शैलेश मोरे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ - मा.शैलेश मोरे व मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

गेली दिड वर्षे कोरोना प्रतिबंधामुळे नागरिक त्यांच्या घराबाहेर पडलेले नाहीत.त्यामुळे ते संगीत क्षेत्रापासून वंचित झालेले आहेत. माहे नोव्हेंबर /डिसेंबर २०२१ मध्ये कै.प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल,यमुनानगर,येथे संगीत महोत्सव कार्यक्रम आयोजित केल्यास यमुनानगर परिसरातील नागरिकांना संगीत कार्यक्रमाचा लाभ घेता येईल. सबब, पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या वतीने कै.प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल,यमुनानगर,येथे माहे नोव्हेंबर /डिसेंबर २०२१ मध्ये संगीत महोत्सव कार्यक्रम आयोजित करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळिणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

---------------------

ठराव क्रमांक - ५२ विषय क्रमांक - ०४

दिनांक - १२/१०/२०२१

सुचक :- मा.शैलेश मोरे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ - मा.शैलेश मोरे व मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.प्रशा./२/कावि/१३५/२०२१दि.१२/२/२०२१ अन्वये क्रीडा विभागाकडील स्थापत्य विषयक कामकाज उद्यान स्थापत्य विभागाकडे सोपविण्यास मान्यता दिलेली आहे.त्यानुसार क्रीडा विभागाकडील विद्युत विषयक कामकाज तातडीने होण्याच्या दृष्टीने क्रीडा विभागासाठी क्रीडा विद्युत विभाग तयार करून आवश्यक अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

सबब, मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.प्रशा./२/कावि/१३५/२०२१दि.१२/२/२०२१ अन्वये क्रीडा विभागाकडील स्थापत्य विषयक कामकाज उद्यान स्थापत्य विभागाकडे सोपविण्यास मान्यता दिलेप्रमाणे, क्रीडा विभागाकडील विद्युत विषयक कामकाज तातडीने होण्यासाठी,क्रीडा विद्युतअसा

स्वतंत्र विभाग तयार करून आवश्यक अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करणेस मान्यतादेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

--------------------

**यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.**

( **उत्तम प्रकाश केंदळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४८८/२०२१
दिनांक : २२/१०/२०२१



**( उल्हास बबनराव जगताप )**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी